## प्रथम अध्याय

### श्री शाहू छत्रपति मिलची ऐंत्याहासिक पार्श्वभूमी ----

## : प्रथम अध्याय :

### १.१ औद्योगिकरणाचे महत्व :---

आधुनिक काळात देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे व झालेला विकास टिकवून ठेवणे याला फार महत्व प्राप्त झाले आहे. जगातील विविध देशाकडे पाहिले असता असे दिसते की, कांही देश विकसित आहेत उदा. इंग्लंड, अमेरिका व रशिया, तर कांही देश विकसनशील म्हणजे विकासाच्या मार्गावर आहेत. उदा. भारत, अविकसित देशांचा आर्थिक विकास साध्य करताना औद्योगिकरणाला जास्त महत्व द्यावे लागते. विकसित व अविकसित देशांची दरडोई उत्पन्नाची तुलना केली तर यामध्ये फार मोठी तफावत असल्याचे आढळते. विकसित देशातील अर्थव्यवस्था ही बहुतांशी उद्योग प्रधान असतात तर अविकसित देशातील अर्थव्यवस्था ही शेती प्रधान असल्याचे आढळते. मात्र ज्या देशांना नैसर्गिक साधन सामुग्री विपूल प्रमाणात प्राप्त झाली आहे त्या देशात उच्च दरडोई उत्पन्न असल्याचे दिसून येते. उदा. पेट्रोल निर्यात देश ( अरेबिया, कुवेत, सौदीअरेबिया इत्यादि ) अर्थात असे देश म्हणजे एक विशिष्ठ किंवा अपवादात्मक घटक म्हणता येतो. याचाच अर्थ औद्योगिकरणावर भर देणे व त्याच्या साहाय्याने आर्थिक विकास साध्य करणे हे निश्चित होते. भारताचा विचार केला तर स्वातंत्र्य पूर्व काळात औद्योगिकरणाच्या वाढीचा वेग कमी होता. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र औद्योगिकरणावर भर देण्यात आला. त्यासाठी निरनिराळ्या कालखंडात औद्योगिक धोरणे देखील जाहिर करण्यात आली आहेत. उदा. १९४८, १९५६, १९७०, १९७३, १९७७ व १९८० इत्यादि. आता या ठिकाणी

औद्योगिकरण म्हणजे कोणते उद्योगधंदे असा प्रश्न निर्माण होण्याचे कारण नाही. अर्थव्यवस्थेतील विशाल, मध्यम, लघु व कुटीरोद्योग यांची प्रगती झाली तर देशाची अर्थव्यवस्था विकासाच्या पातळीला पोहोचते.

औद्योगिकरणापासून देशाला विविध फायदे मिळत असतात. विशेषत: आयात - निर्यातीत वाढ, उत्पादनात वाढ, दरडोई उत्पादनात वाढ, रोजगार निर्मिती, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ, बँकांची प्रगती असे अनेक फायदे देशाला होत असतात. थोडक्यात औद्योगिकरणाशिवाय आर्थिक विकास ही अशक्य प्राय गोष्ट आहे.

## १.२. भारतातील कापड उद्योग --

औद्योगिकरणामध्ये विशाल उद्योगधंदे महत्वपूर्ण समजले जातात. स्वातंत्र्यपूर्व काळात जरी औद्योगिकरणाच्या वाढीचा वेग कमी असला तरी कापड उद्योग मात्र जुने समजले जातात. कारण १८१८ पासून या व्यवसायाला सुरुवात झाल्याचे दिसून येते. तो एक सुसंघटीत व्यवसाय म्हणून गणला जातो. शिवाय यामधून लोकांना रोजगार प्रत्यक्षारित्या पुरविला जातो. अर्थात श्रमिक हा उत्पादन प्रक्रियेचा एक महत्वाचा घटक असून त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कापड निर्मिती आणि त्याची निर्यात ही परंपरागत कापड उद्योगाची वैशिष्ट्ये तर एकेकाळची शक्तीसाधने आहेत. इंग्लंड मधील औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून जरी ब्रिटिश सरकारने हा उद्योग उद्‌ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला असला तरी देखील भारताने पुन: या उद्योगाच्या प्रगतीकडे जोराने वाटचाल केल्याचे दिसून येते. उत्पादनाच्या स्थूल मूल्यांच्या दृष्टीकोणातून जरी विचार केला तरी देखील हा उद्योग महत्वाचा समजला जातो. या उद्योगाच्या प्रगतीकडे दृष्टीक्षेप टाकल्यास असे दिसून येते की, १८५४ मध्ये एक कापड गिरणी तर १९४७ पर्यन्त ४२३ कापड गिरण्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

पुढील तक्त्यावरुन कापड गिरण्याची वाढ आपल्या लक्षात येईल :--

तक्ता क्र.१.१ : कापड गिरण्यांची स्वातंत्र्यपूर्वीची संख्या

| वर्ष | स्वातंत्र्यपूर्वीची कापड गिरण्यांची संख्या |
|---|---|
| १८५४ | ०१ |
| १८८९ | १०८ |
| १९०१ | १९० |
| १९१३ | २५९ |
| १९२३ | २९२ |
| १९३३ | ३४४ |
| १९४३ | ३९८ |
| १९४७ | ४२३ |

साधन -- Report of the study group for Cotton Textile Industry.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की १९०१ पासून १९४७ पर्यन्त कापड गिरण्यांच्या संख्येत बरीच वाढ झालेली आहे याचे प्रमुख कारण म्हणजे हिंदूस्तानात सुरु झालेली राष्ट्रीय चळवळ हे होय. राष्ट्रीय चळवळीमुळे परकीय मालावर बहिष्कार घालण्यात आला. त्यामुळे परकीय कापड स्वदेशात आणण्यास बंदी घालण्यात आली, त्याचा परिणाम स्वदेशी मालाला ( कापड ) स्वदेशातच मोठी मागणी येऊ लागली त्यामुळे कापडाची मागणी वाढली. सहाजिकच मागणी वाढल्यामुळे

उत्पादन वाढविणे भाग पडले. त्यासाठी नवीन कापड गिरण्या स्थापन करणे गरजेचे वाटू लागले. थोडक्यात राष्ट्रीय चळवळीचा परिणाम कापड गिरण्यांची प्रगती होण्यामध्ये झाला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कापड गिरण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. विशेषत: १९७६ मध्ये याची संख्या ७०४ तर १९८२ पर्यन्त एकूण कापड गिरण्यांची संख्या ८०५ एवढी झाली. आज जवळ जवळ ही संख्या १००० पर्यन्त असेल. या उद्योगाचा आपण नुसता संख्यात्मक विचार करतो. परंतु त्याचा गुणात्मक देखील विकास होण्याची काळाची गरज आहे. आज यातील बऱ्याचशा कापड गिरण्या आजारी अवस्थेत आहेत. विशेषत: महाराष्ट्रामध्ये आजारी गिरण्यांची संख्या १०० च्या वरती आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळातील या उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घेताना असे दिसून येते की, " १९५२ मध्ये या उद्योगाची रचना व व्यवस्थापना करीता ' कानुंगो समिती ' नेमण्यात आली. या समितीने महत्वाची अशी शिफारस केली की, " जे उत्पादन हातमागाच्या आधारे करणे सोईचे आहे असे उत्पादन सोडून बाकीच्या कापड उत्पादनात हातमागाचे हळुवारपणे यंत्रमागात रुपांतर करावे. कारण तांत्रिकदृष्ट्या हातमागापेक्षा यंत्रमाग अधिक कार्यक्षम असल्याने रोजगार वाढून वेतन वाढेल. असे रुपांतर १५ ते २० वर्षांत घडवून आणावे. नियोजन मंडळाने नेमलेल्या कर्वे समितीने मात्र या उलट शिफारस केली, ती म्हणजे ' यंत्रमाग व गिरण्या यांना उत्पादन बांधून व आवश्यक ते सर्व उत्पादन हातमागावर करण्यात यावे ' सरकाने याच शिफारशीची अंमलबजावणी केली"[१]

---

१ प्रा.व्ही. आर. माने -' नवे वस्त्रोद्योग धोरण ' - पृ.१४

१.३ नियोजन काळातील या उद्योगाचा थोडक्यात आढावा ---

पहिल्या पंचवार्षिक योजनेत या उद्योगाची कार्यक्षमता व उत्पादन हे नियोजनापेक्षा वाढलेले होते. देशातील लोकसंख्या वाढी बरोबरच दरडोई कापड उपभोग वाढू लागला. दुसऱ्या योजनेतील वाढते उत्पादन त्यामुळे कापडाची मागणी वाढली, त्याचा परिणाम पुन्हा उत्पादन वाढले. तिसऱ्या योजनेत जवळ जवळ २५,००० स्वयंचलित यंत्रमागांची स्थापना करण्यात आली. चौथ्या व पाचव्या योजनेत मात्र विद्युत शक्तीच्या अपूऱ्या पुरवठयामुळे लक्ष निश्चित करता आले नाही. सहाव्या योजना काळात ( १९७९-८० ते १९८४-८५ ) आपणास असे दिसून येईल की, संयुक्त गिरण्या २८० संयुक्त गिरण्यातील यंत्रमाग संख्या २ लाख ११ हजार, सूत गिरण्यांची संख्या ५२५ वर गेल्याचे आढळून येते. तर सातव्या योजनेत ( १९८५-८६ ते १९८९-९० ) कापडाचे उत्पादन १४,५०० मिलियन मीटर्स निश्चित करण्यात आले. तर संघटित क्षेत्रातील लुम्समधून २.१० लाख एवढी कार्यक्षमता ७ लाख एवढी कार्यक्षमता पॉवर लुम्स आणि ४ मिलियन एवढी कार्यक्षमता हॅन्डलुम यातून उपयोगात आणून १५,००० मिलियन मीटर्स कापडाची उलाढाल करण्याची निश्चिती करण्यात आली.

भारतातील कापड गिरण्यामधून विभागानुसार रोजगाराची उपलब्धता ( हजारामध्ये ) दररोज सरासरी किती कामगारांना होते ते खालील तक्त्यावरून स्पष्ट होते. :--

तक्ता १.२ : विभागानुसार रोजगारीची उपलब्धता --

१९७४ ते १९८३ अखेर

| वर्ष | स्पिनिंग विभाग | विव्हिंग विभाग | प्रक्रिया व इतर विभाग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९७४ | २९६ | २५८ | २३४ | ७८८ |
| १९७५ | ३०० | २५४ | २२६ | ७८० |
| १९७६ | २९४ | २४६ | २२० | ७६० |
| १९७७ | ३०७ | २५८ | २५१ | ८१६ |
| १९७८ | ३२० | २६२ | २६० | ८४२ |
| १९७९ | ३२८ | २६८ | २६६ | ८६२ |
| १९८० | ३३६ | २७० | २६९ | ८७३ |
| १९८१ | ३४० | २६६ | २७४ | ८८० |
| १९८२ | ३०२ | १९७ | २२४ | ७२३ |
| १९८३ | ३२५ | २२७ | २४७ | ७९९ |

आधार : Commerce Weekly , October, 1984.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९७४ ते १९७६ या काळात स्पिनिंग विभागातील रोजगारीचे प्रमाण कमी अधिक झाल्याचे आढळते. विव्हिंग विभागातील याचे प्रमाण याच काळात कमी झाल्याचे तर प्रक्रिया व इतर विभागातील रोजगारीचे प्रमाण देखील त्याच काळात कमी झाल्याचे दिसते. १९७७ ते १९८१ या काळात मात्र तिन्ही विभागातील रोजगारीच्या प्रमाणात थोड्या फार प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. मात्र १९८२ ते १९८३ या काळात स्पिनिंग विभागातील रोजगारीचे प्रमाण कमी होऊन

परत वाढल्याचे आढळते. विव्हिंग विभागातील रोजगारीचे प्रमाण १९८२ मध्ये मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे दिसते. मात्र प्रक्रिया व इतर विभागातील रोजगारीचे प्रमाण २२४ हजारा वरुन २४७ हजारापर्यन्त वाढल्याचे आढळते. एकंदरीत १९८२ पासून प्रत्येक विभागातील रोजगारीचे प्रमाण कमी अधिक होण्याचे कारण म्हणजे सरकारचे वस्त्रोद्योग विघायक असलेले प्रतिकूल धोरण हेच म्हणावे लागेल.

भारत सरकारने ६ जून १९८५ मध्ये नवे वस्त्रोद्योग धोरण ( New Textile Policy ) जाहिर केले. या धोरणाचा प्रमुख उद्देश म्हणजे कापड उत्पादनात वाढ करणे, त्याची गुणवत्ता टिकवून ठेवणे, वाजवी किंमतीत वाढत्या लोकसंख्येची वस्त्र गरज पूर्ण करणे व रोजगार निर्मिती व निर्यात यावर देखील लक्ष केन्द्रीत करण्याचा होता.

## १.४ महाराष्ट्रातील कापड उद्योग ---

महाराष्ट्राच्या औद्योगिक रचनेत या उद्योगाने महत्वाचे स्थान पटकावले आहे. भारतात ९६१ एवढे स्पिनिंग आणि विव्हिंग मिल्स असून त्यापैकी १६३ मिल्स महाराष्ट्रात आहेत म्हणजेच महाराष्ट्रात १८.१ टक्के एवढया स्पिनिंग व विव्हिंग मिल्स आहेत. सध्या भारतामध्ये ६७ एवढया सहकारी स्पिनिंग मिल्स असून त्यापैकी जवळ जवळ २५ एवढया सहकारी स्पिनिंग मिल्स महाराष्ट्रात आहेत.

कापड उद्योगाचे अगदी पूर्वीपासून मुंबई व अहमदाबाद या शहराच्या ठिकाणी एकत्रीकरण झालेले आहे. पहिली कापड गिरणी महाराष्ट्रात १८५४ मध्ये मुंबई येथे स्थापन करण्यात आली. त्यासाठी ५० व्यापारी एकत्र आले व त्यांनी संयुक्त भांडवली संस्थेची स्थापना केली. शेवटी यामध्ये ते यशस्वी होत गेले. पहिल्या महायुध्दानंतर ३९ स्पिनिंग मिल्स होत्या .

महायुध्दा नंतर अलीकडील याच्या विकासाला चालना मिळाली. कारण युध्दकाळातील तंग परिस्थितीत कापडाची आयात करणे कठीण होऊन बसले मात्र कापडाची मागणी वाढत गेली, त्यामुळे भरपूर प्रमाणात फायदा मिळत गेला. मुंबईतील गिरण्यातील सरासरी आकार इतर गिरण्यापेक्षा मोठा होता, त्यामुळे मुंबई मध्ये या उद्योगाचे जाळे निर्माण झाले. अर्थात याला कांही घटक कारणीभूत ठरले आहेत, त्यामध्ये मुंबईचे उष्ण व दमट हवामान, मुंबई उत्तम प्रकारचे बंदर, रस्ते व लोहमार्ग विकास त्यामुळे कापसाची आयात व तयार कापडाची निर्यात करणे सुलभ, भरपूर जलविद्युत प्रकल्पापासून वीज पुरवठा, प्रगत शेअर बाजार, बॅन्कांचे जाळे, विमा कंपन्या, पारशी व भाटीया यांच्याकडून होत असलेला भांडवल पुरवठा व इतर भागातून होत असलेला स्वस्त मजूरांचा पुरवठा इत्यादि सर्व कारणांमुळे कापड उद्योग मुंबई - मध्ये प्रगत झाला आहे, त्यामुळे मुंबईला भारताचे ' मँचेस्टर ' असे संबोधण्यात येऊ लागले.

विशेषात: दुसऱ्या महायुध्दाच्या काळात ' बॉम्बे मिल्स असोशिएशनच्या ' नेतृत्वाखाली कापड उत्पादन करण्याचे ठरविण्यात आले, त्यामुळे केन्द्र सरकारने राज्य सरकारच्या मदतीने उत्पादन वाढविण्याचे ठरविले. महाराष्ट्राच्या एकूण उत्पादनात या उद्योगापासून मिळणाऱ्या उत्पादनाचा वाटा बराच मोठा आहे. तसेच देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात देखील या उद्योगाने मोठी भर घातली आहे. रोजगारीच्यादृष्टीने विचार केल्यास १९७८-७९ मध्ये २४ टक्के म्हणजे कारखान्यातील कामगारांपैकी २४ टक्के कामगारांना या उद्योगापासून रोजगार मिळाला आहे. याचाच अर्थ कारखाना कामगारांपैकी $\frac{1}{4}$ टक्के कामगारांना या उद्योगापासून रोजगार उपलब्ध झाला आहे.

खालील तक्त्यावरुन महाराष्ट्रातील १९८३ पर्यन्तची प्रगती दिसून येईल :--

तक्ता १.३ : १९८३ पर्यन्तची महाराष्ट्रातील या उद्योगाची प्रगती ---

| राज्य | स्पिनिंग मिल्स | स्पिंडल्स (हजार) | कांपोझिट मिल्स | स्पिंडल्स इंस्टल्ड (हजार) | लुम्स ईस्टल्ड | एकूण मिल्स | स्पिंडल्स (हजार) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.मुंबई | १ | ५६ | ५३ | ३३९३ | ६१,९२४ | ५४ | ३,४४९ |
| २.टेस्ट ऑफ महाराष्ट्र | २६ | ६४४ | २५ | ८७७ | १५,५८७ | ५१ | १,५२१ |
| एकूण | २७ | ७०० | ७८ | ४२७० | ७७,५११ | १०५ | ४,९७० |

आधार : Commerce Weekly, Bombay, Oct., 1984.

एकंदरीत सरकारने ६ जून १९८५ मध्ये वस्त्रोद्योग धोरण जाहीर केल्यानंतर देशातील ब-याचशा कापड गिरण्या बंद पडल्या. विशेषत: ते आपल्याला खालील तक्त्यावरुन दिसून येईल.

तक्ता १.४ : बंद पडलेल्या कापड गिरण्यांची संख्या १९८५ ते एप्रिल १९८८ --

| वर्ष | बंद पडलेल्या गिरण्यांची संख्या | |
|---|---|---|
| १९८५ | | ७० |
| १९८६ | | ७५ |
| १९८७ | | १२० |
| एप्रिल १९८८ | | १३३ |
| | एकूण | ३९८ |

आधार -- ' महाराष्ट्र टाईम्स ' ६ एप्रिल १९८८, पृ.६.

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सरकारच्या एकंदरीत नव्या वस्त्रोद्योग धोरणाने कापड गिरण्या बंद पडण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. विशेषत: वस्त्रोद्योग धोरण जाहीर झाल्यानंतर कांही काळात गिरण्या बंद पडल्या, त्याची संख्या १९८५ अखेर ७० एवढी होती, त्यानंतर हाच आकडा एप्रिल १९८८ पर्यन्त १३३ वर गेल्याचे दिसते म्हणजेच गिरण्या बंद पडण्यातील वाढ जवळ जवळ दुप्पट अशीच म्हणावे लागेल * त्यामुळे जवळ जवळ या उद्योगातील १ लाख ७८ हजार कामगार बेकार झाले आहेत, त्याच प्रमाणे सरकारने १९८३ मध्ये मुंबईतील १३ गिरण्या ताब्यात घेतल्या. परंतु त्यातील १८ हजार कामगार अद्यापही बेकार आहेत^Δ * नव्या वस्त्रोद्योग धोरणाचा कांहीही प्रभाव पडलेला नाही, त्यामुळे रोजगार वाढण्याऐवजी बेकारीत भर पडत आहे, गिरण्या बंद पडत आहेत, कापडाचे उत्पादन घटत आहे, तेव्हा या धोरणाचा फेरविचार करावा असे विरोधी पक्षाचे मत आहे.

---

आधार Δ - ' महाराष्ट्र टाइम्स ' - ६ एप्रिल १९८८, पृ.६ .

## १.५ श्री शाहू छत्रपति मिल्स, कोल्हापूर --

या ठिकाणी श्री शाहू महाराजांचे आर्थिक धोरण कशा प्रकारचे होते आणि शाहू मिल्ची जडणघडण कशा प्रकारे होत गेली याचे विवेचन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### १.५.१ श्री शाहू छत्रपतींचे आर्थिक धोरण --

एखाद्या देशामध्ये उद्योगांचा विकास होत आहे असे म्हटल्यानंतर आपल्यापुढे असे चित्र उभे राहण्याची शक्यता आहे की, देशाच्या सर्व विभागात तो धंदा विकसित होत आहे. परंतु भारतातील कापड गिरण्या स्वातंत्र्यपूर्वकाळात कांही महत्वाच्या शहराच्या ठिकाणी केन्द्रीभूत झाल्या होत्या. कोल्हापूर सारख्या संस्थानात एखादी कापड गिरणी स्थापन होऊन ती विकसित होते हे पाहिल्यानंतर निश्चितच तेथील संस्थानिकांचा पाठींबा असला पाहिजे. कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभारात स्थिरता नसताना शाहू महाराजांनी अधिकार सुत्रे हाती घेतली. आर्थिक व राजकीय परिस्थिती अनुकूल नसताना त्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडून त्यांनी विधायक कार्य करण्यास सुरुवात केली. समकालीन कांही संस्थानिकांनी आर्थिक व सामाजिक प्रगती घडवून आणली होती. अशा पैकी म्हैसूर व त्रावणकोर ही संस्थाने होत. परंतु शाहू महाराजांनी या संस्थानिकापेक्षा वेगळे असे आर्थिक धोरण अत्यंत काळजीपूर्वक आखले होते. आर्थिक प्रगती व मागासलेल्या जनतेचे कल्याण ही तर त्यांच्या आर्थिक धोरणाची उद्दिष्टये होतीच. परंतु त्या काळच्या जुनाट स्थितिप्रिय समाज रचनेत बदल घडवून आणणे हे शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा एक महत्वाचा भाग होता. दारिद्र्याशी झगडून ते दूर करणे व आपल्या समाजातील लोकांना चांगले जीवन जगता यावे अशी अपेक्षा शाहू महाराजांनी केली. त्यातूनच त्यांच्या आर्थिक धोरणाचे दोन मुद्दे स्पष्ट होतात.

" माझ्या प्रजेतील समर्थ घटकापेक्षा दुबळ्या घटकांची काळजी अधिक घेणे हे माझे तत्व आहे आणि हाच दृष्टीकोण ठेवून गेल्या पंचवीस वर्षापासून मी अटोकाट प्रयत्न करीत आहे "^

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाची थोडक्यात उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :--

सार्वजनिक धोरणाचा प्रसार व विस्तार करून पुरोगामी योजना कार्यान्वित करणे, जाती निरपेक्ष समाज निर्माण करणे, सामाजिक सेवा पुरविणे व रोजगार संधी उपलब्ध करून देणे, उत्पादकता वाढविण्यासाठी कर्ज पुरवठा, तांत्रिक, व्यावसायिक व सार्वजनिक शिक्षणाच्या सोई करून देणे, संघटित बाजारपेठा वसविणे, उद्योग , व्यापार व अर्थ व्यवहारात सहकारी व संयुक्त क्षेत्रांना चालना देणे इत्यादी धोरण विषयक उद्दिष्टांचा स्वीकार शाहू महाराजांनी केला. शाहू महाराजांचे देखील असे स्पष्ट मत होते की, औद्योगिक - रणावर आर्थिक संपन्नता अवलंबून असते. सहकारी उद्योग व संयुक्त उद्योगधंदे वाढवावेत असे त्यांना वाटत होते. कारखानदारीतील मक्तेदारीवर संपूर्ण अवलंबून राहणे योग्य नाही. एकंदरीत असे दिसते की सहकारी तत्वावर शाहू महाराजांनी अधिक भर दिला होता. त्यांच्या या आर्थिक धोरणावरूनच आपल्याला असे दिसते की, त्यांची शाहू मिलच्या स्थापनेमागे किती प्रेरणा होती.

शाहू महाराजांना शेतीच्या विकासाबरोबरच औद्योगिक विकास व व्यापार यांची भरभराट झाली पाहिजे असे वाटत होते कारण औद्योगिक विकास हा दोन दृष्टीकोनातून महत्वाचा ठरतो. देशाची साधन संपत्ती, राष्ट्रीय उत्पन्न व व्यापार हा एका बाजूला वाढतो आहे, तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण व शहरी लोकांना रोजगारीची संधी प्राप्त होते. शाहू महाराजांनी

---

आधार - ^ डॉ. वि.बा.धुमे " - शाहू महाराजांचे आर्थिक धोरण एक चिकित्सक अभ्यास " - पृ.नं. २९

युरोपीयन देशातील महत्वाच्या ठिकाणी ज्या भेटी दिल्या, त्यापासून त्यांना औद्योगिक विकासाची कल्पना सुचली. मुख्यत: इंग्लंडची औद्योगिक क्रांती, अर्थात केवळ एखादी कल्पना सुचली म्हणजे आर्थिक विकास नव्हे तर त्यासाठी दूरदृष्टी, धाडस व संयोजकत्व या तीन गुणांची आवश्यकता असते. या तिन्ही गुणांचे एकत्रिकरण शाहू महाराजांच्या विचारात झाल्याचे दिसून येते. मात्र उद्योगधंद्याच्या केन्द्रीकरणावर त्यांचे विशेष लक्ष नव्हते. तर विकेन्द्रीकरण त्यांना योग्य वाटत होते कारण बकाल शहरांची वाढ होऊन त्याचे दुष्परिणाम सहन करण्यापेक्षा विकेन्द्रीकरणाने विविध भागात प्रगती साध्य करता येते. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर मधील श्री शाहू छत्रपति मिल्सचा पूर्व इतिहास पाहणे हे अत्यंत उद्‌बोधक ठरते.

१.५.२ श्री शाहू छत्रपति मिल्सची जडण-घडण --

करवीर नगरी म्हणजे साक्षात महालक्ष्मीचे देवस्थान, मग तेथील वैभव आपोआप आलेच. अर्थात वैभव प्रदर्शित करणाऱ्या अनेक घटकाकडे पाहत गेल्यास यातील पहिला घटक शाहू महाराजांच्या काळातील म्हणा किंवा आधुनिक काळातील म्हणा तो म्हणजे श्री शाहू छत्रपति मिल्सची स्थापना होय. इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांती १७६० मध्ये सुरु झाली, तर दक्षिण महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाची सुरुवात ही शाहू मिल्स स्थापनेने झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. विशेषात: १९०६ मध्ये श्री शाहू महाराजांच्या हस्ते स्पिनिंग व विव्हिंग विभागाचा पायाभरणी समारंभ झाला. सुरुवातीस सामाईक भांडवलाच्या तत्वावर सुरु झालेली ही गिरणी नंतर राजाश्रयाखाली आली. आणि त्यानंतरच या मिल्सची खरी भरभराट झाली. अर्थात या मिल्सच्या स्थापने पाठीमागे कोल्हापूरचे वैभव वाढविणे हा प्रमुख उद्देश शाहू महाराजांचा नव्हता तर गरीब गटातील लोकांची वस्त्राची गरज स्वस्त दराने कशी भागविता येईल हा प्रमुख उद्देश महत्वाचा होता. तसेच मिल्ससाठी आवश्यक असलेल्या कच्च्यामालाचा मुबलक पुरवठा, बाजारपेठेची उपलब्धता या व इतर अर्थशास्त्रीय गरजा पूर्ण कशा प्रकारे करता येतील यादृष्टीने वाटचाल करण्याचे प्रयत्न शाहू

महाराजांनी केले.

विशेषात: पहिल्या महायुध्दाच्या काळात या मिल्सच्या विकासास अधिकच चालना मिळाली. कारण लोकांच्याकडून येणारी कापडाची मागणी वाढतच होती. शिवाय ती मागणी केवळ शहरापुरतीच मर्यादित न राहता देशाच्या इतर भागातून व परकीय देशांच्याकडून देखील येत होती, त्यामुळे तिची प्रगती होत गेली.

## श्री शाहू छत्रपति मिल्सच्या जडण-घडणीचे टप्पे --

श्री शाहू मिल्सच्या जडण-घडणीच्या बाबतीत खालील कालखंडातील टप्प्यांचा विचार करण्यात आला.

### (१) १९०६ ते १९२७ ---

" १९०६ मध्ये शाहू मिल्सचे रजिस्ट्रेशन १५ लाख रुपयाच्या भांडवलाच्या साहाय्याने करण्यात आले. तत्कालीन परिस्थितीत कोल्हापूर संस्थानमध्ये प्लेगाच्या साथीचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला होता. मात्र त्याचा परिणाम मिल्सच्या बांधकामावर झाला नाही. फेब्रुवारी १९०९ मध्ये प्रत्यक्ष मिल्सच्या कामकाजास प्रारंभ झाला. मार्च १९११ पर्यन्त मिल्सच्या १० हजार शेअर्स पैकी ५४८३ शेअर्स विकले गेले व ११,३८८ स्पिंडल्स काम करीत होते, मिलमध्ये दररोज २१७ कामगार कामावर येत होते. त्यानंतर १९१२-१३ च्या अहवालाप्रमाणे स्पिंडल्सची संख्या वाढली नाही. मात्र उत्पन्नात ६,००,८७१ रुपयांनी वाढ झाली, त्याच प्रमाणे कामगारांची संख्याही २१७ वरुन ४४५ वर गेली. मिल्सच्या १० हजार शेअर्स पैकी १,९१३ पर्यन्त प्रत्येक शेअर्स १०० रुपयांचा या प्रमाणे ५,९२४ शेअर्सची विक्री झाली. नोव्हेंबर १९१३ नंतर मात्र मिल्सच्या आर्थिक कमतरतेमुळे काम थप्प झाले. त्यानंतर १९१८-१९ च्या अहवालाप्रमाणे मिल्सच्या कामकाजास पुन्हा सुरुवात झाली.^ "

---

आधार ^ - प्रा.सौ.मीना कुलकर्णी, प्रा.ब.शि.कुलकर्णी -- ' श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण ' - पृ.६५.

(२) <u>१९२८ ते १९३५ --</u>

" १९२८ पर्यन्त मिल्समध्ये केवळ सूताचेच उत्पादन केले जात होते. त्यानंतर मात्र राजाराम महाराजांनी यंत्रसामुग्री व बांधकामासाठी ५ लाख रुपये खर्चून कापड विणण्याचा विभाग सुरु केला^ "

युध्द परिस्थिती तत्कालिन काळामध्ये फार काळ टिकली नाही. त्यामुळे स्पर्धा वाढली, नवीन कल्पना, नवीन उत्पादन तंत्र आणि बाजारपेठातील नव-नवीन प्रकारचे कापड यांचा एकत्रित परिणाम म्हणजे या मिल्सच्या कापड मागणीवर झाला, त्यामुळे उत्पादनात कपात करावी लागली. तसेच जागतिक मंदीची झळ पोहोचली. विशेषत: महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्या समाजाकडून कापडाला मागणी यायला हवी होती, त्या समाजाची खरेदी शक्ती कमी झाल्यामुळे येऊ शकली नाही, त्याचा एकत्रित परिणाम असा झाला की, १९३६ मध्ये मिल्सला फार मोठा तोटा सहन करावा लागला.

(३) <u>१९३६ ते १९५१ --</u>

१९३६ मध्ये मिल तिच्या संपत्तीसह कोल्हापूर संस्थानकडे सुपूर्त करण्यात आली. त्यानंतर तिचे व्यवस्थापन जेमस फिन्ले आणि कंपनी ( James Finelay and Company ) यांच्याकडे देण्यात आले. या नवीन व्यवस्थापनांने नफा वाढविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला. तरी देखील फार मोठे यश प्राप्त झाले नाही. उत्पादनात वाढ झाली तरी देखील बाजारपेठेची परिस्थिती समाधान कारक नसल्याने नव्या व्यवस्थापकांना आपले ध्येय साध्य करता आले नाही.

१९४८ मध्ये कोल्हापूर संस्थानचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण झाले, त्यामुळे मुंबई सरकारने मिल्सची संपूर्ण संपत्ती हस्तगत केली अर्थात मिल्स ही

---

संदर्भ ^ - डॉ. वि.बा.घुगे - 'छत्रपति शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण - एक चिकित्सक अभ्यास' - पृ.१६२

मुंबई राज्याच्या मालकीची झाली. परंतु तिचे व्यवस्थापन मात्र जेम्स फिन्ले आणि कंपनी यांच्याकडेच राहिले. १९५६ पर्यन्त या मिल्समध्ये बाष्पशक्तीचा वापर केला जात होता.

(४) १९५९ ते १९६७ --

१९५६ ची सुरुवात ही विद्युतीकरणाच्या साहाय्याने झाली, यावेळी सूत काढण्याचा विभाग दोन पाळ्यामध्ये व विणण्याचे काम एका पाळीमध्ये केले जाऊ लागले. या विस्तारानंतर २०० स्वयंचलित लुम्स मिल्समध्ये बसविल्या गेल्या आणि सूत काढण्याचा विभाग तीन पाळ्यामध्ये तर विणण्याचा विभाग दोन पाळ्यामध्ये विभागला गेला. १९६० च्या मुंबई पुनर्रचना कायद्यानुसार ही मिल्स राज्यसरकारची व्यापारी संस्था म्हणून घोषित केली, त्यामुळे सर्व व्यवहार सरकारच्या तर्फे केले जाऊ लागले.

सन १९३६ ते ३१ मे १९५९ पर्यन्त मिल्सचे व्यवस्थापन एजन्सी तत्वावर केले जात होते. त्यानंतर मात्र बुधगांव ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे १ जून १९५९ ते १ जून १९६७ पर्यन्त व्यवस्थापन एजन्सी तत्वावर सोपविण्यात आले. नंतर बुधगांव ट्रेडिंग कंपनीचे मे.जी.एल. नातू ॲण्ड सन्स प्रा. लि. असे नामकरण करण्यात आले. नातू ॲण्ड सन्स यांच्या व्यवस्थापन काळात उत्पादन आणि गुणवत्ता या दोन्हीकडे लक्ष केन्द्रित करण्यात आले.

(५) १९६७ पासून आजपर्यन्त --

१ जून १९६७ ला महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाची स्थापना करण्यात आली. नंतर या मिल्सचे व्यवस्थापन एजन्सी तत्वावर या महामंडळाकडे सोपविण्यात आले. २७ मार्च १९७५ मध्ये या मिल्सचा विस्तार होऊन आधुनिकीकरणाचा कार्यक्रम आखण्यात आला, त्यामध्ये विस्तारीत कार्यक्रम आणि आधुनिकीकरणाचा अंदाजे खर्च निश्चित करण्यात आला तो खालीलप्रमाणे :--

| कार्यक्रम | आधुनिकीकरणाचा अंदाजे खर्च |
|---|---|
| १) आधुनिकीकरण कार्यक्रम | ५० लाख रुपये |
| २) विस्तारीत योजना | ८० लाख रुपये |
| ३) प्रक्रिया गृहांच्या स्थापनेसाठी | ५४ लाख रुपये |
| एकूण | १८४ लाख रुपये |

महाराष्ट्र सरकारच्या आधुनिकीकरणाच्या मान्यतेनंतर भारतीय औद्योगिक विकास बॅन्केने देखील या मिलला वित्तपुरवठा करण्याच्या योजना आखल्या . मार्च १९७७ च्या समाप्तीनंतर व्यवस्थापक मंडळाने मिलच्या आधुनिकीकरणाचा कार्यक्रम आखून प्रक्रिया गृहांची संख्या वाढविण्यावर व प्रगतीवर भर देण्यात आला.

१९७५-७६ मध्ये मिलला २५ लाख रुपयाचे फन्डस सरकारकडून उपलब्ध झाले. त्यानंतर भारतीय औद्योगिक विकास बॅन्के ने १९७५-७६ मध्ये ५० लाख रुपयाचे अर्थसाहाय्य केले. त्यानंतर यामध्ये बदल करुन बॅन्केने ७५ लाख रुपयाचे वित्तपुरवठा करण्याचे ठरविले. मात्र २५ लाख रुपयाचे अर्थसाहाय्य १९७६-७७ या वर्षासाठी करण्याचे ठरविले.

वरील अर्थ साहाय्यामुळे मिलचे आधुनिकीकरण नोव्हेंबर १९८४ पर्यन्त पूर्ण करण्यात आले. तसेच प्रगत प्रक्रिया गृहांची उभारणीही करण्यात आली.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत विशाल उद्योग हे महत्वाचे मानले जातात. कारण त्यावर देशाचा आर्थिक विकास बराचसा अवलंबून असतो. भारतीय अर्थव्यवस्थेत कापड उद्योग हा एक विशाल आणि जुनाट प्रकारचा

महत्वाचा उद्योग आहे, त्यादृष्टीने त्याचे महत्व पाहणे आवश्यक आहे अर्थात येथे एका कापड गिरणीचा अभ्यास करुन त्यावरुन कांही सामान्यीकरण करता येते कां ते पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील एका गिरणीच्या अभ्यासावरुन काढलेले निष्कर्ष सर्वच कामगाराच्याबाबतीत अगदी तंतोतंत सर्वत्र खरे ठरतील असे मात्र नाही. परंतु कामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवरुन किमान कांही गिरण्यांच्या संदर्भात तरी परिस्थितीचा अंदाज बांधता येईल. सदर अभ्यासामध्ये तुलनात्मक अभ्यास पध्दती नसल्याने व अभ्यासाची व्याप्ती एकाच गिरणीपुरतीच मर्यादित असल्याने येणाऱ्या निष्कर्षाची व्याप्ती देखील मर्यादितच ठरणार आहे. कापड उद्योगातील कामगारांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती कशी असावी यावरुन श्री शाहू छत्रपति मिल्स मधील कामगारांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती कशी असेल याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदरच्या अभ्यासामध्ये केला आहे, त्यासाठी त्याच्या खालील उद्देशाचा विचार करणे आवश्यक ठरते.

अभ्यासाचा उद्देश --

१) श्री शाहू छत्रपति मिल्समधील कामगारांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) श्री शाहू छत्रपति मिल्स कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा शोध घेणे.

३) कोल्हापूर जिल्ह्यातील व करवीर नगरीतील एक वेगळे वैशिष्ट्य व भूषण म्हणून श्री शाहू मिल्सचे भांडवल ,उत्पादन ,रोजगार व व्यवस्थापन इत्यादि विषयी अभ्यास करणे.

४) कापड उद्योगातील कामगारांच्या रोजगार विषयक परिस्थितीचा शोध घेणे.

५) श्री शाहू मिल्समधील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविणे.

## संशोधनाची पध्दती --

अनेक विशाल व मध्यम उद्योगातील कामगारांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती भिन्न असते, या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्याचे एक भूषाण म्हणून ओळखली जाणारी श्री शाहू छत्रपति मिल्स मधील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती विषायी अभ्यास करण्यासाठी या मिल्सची निवड केली आहे. भारतातील कापड उद्योग हा प्रमुख उद्योग म्हणून ओळखला जातो, स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वी विशोषात: ब्रिटिश सरकारच्या कारकिर्दीत या उद्योगाचा तितकासा विकास झालेला नव्हता कारण ब्रिटिशानी आपल्या वसाहती भारतात निरनिराळ्या ठिकाणी स्थापन करून आपल्या देशातील कापडाच्या उत्पादनाला भारतीय बाजार पेठ निर्माण केली. हे कापड मजबूत, टिकावू व किंमतीने कमी असल्याने भारतात त्याचा खप वाढला, त्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम भारतातील कापड गिरण्यावर झाला, त्यामुळे उत्पादन कमी, बेकारीत वाढ अशी परिस्थिती निर्माण झाली. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर मात्र या उद्योगाच्या विकासाला चालना देण्याचे ठरविण्यात आले. कापडाचा उच्च दर्जा, उत्पादन खर्च कमी, अशी उद्दिष्टये निश्चित करून उत्पादनात वाढ करण्यात आली. त्यामुळे कापड उद्योगातील कामगारांना रोजगाराची संधी मिळाली व त्यांच्या कामाच्या परिस्थितीत १९४८ च्या कारखाना कायद्यानुसार सुधारणा करण्यात आली. एवढेच नव्हे तर त्यांना अनेक लाभ मिळवून देण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. उदा. कामगार विमा योजना, भविष्य निर्वाह निधी कायदा, ग्रॅच्यूइटी कायदा, बोनस कायदा इत्यादि वरील कायदे करून सरकारने कामगारांच्या हिताची जपणूक केली असे जरी असले तरी वरील कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी मालक वर्ग करू शकत नाही. अनेक पळवाटातून तो मुक्त होण्याचा प्रयत्न करतो. वरील सर्व सुविधांचा लाभ श्री शाहू छत्रपति मिल्स मधील कामगारांना मिळतो की नाही याचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. तसेच मिल्सचे भांडवल, उत्पादन व रोजगार यांचा अभ्यास करण्यासाठी १९८१-८२ ते १९८६-८७ असा

एकंदरीत सहा वर्षांचा कालखंड विचारात घेतलेला आहे. सदर मिल्सला १९४८चा कारखाना कायदा लागू केला जातो, त्यानुसार कामगारांच्या कल्याणकारी सुविधांचा शोध घेणे तितकेच महत्वाचे आहे.

## श्री शाहू मिल्समधील कामगारांची निवड --

सदरच्या संशोधन अहवालासाठी मिल्समधील कामगारांची विभागानुसार यादी तयार केली त्यानुसार उत्पादकतेशी निगडीत असलेल्या १५५२ कामगारा पैकी विभागानुसार १५ टक्के हे प्रमाण कायम ठेवून १०० कामगारांची नमुना पध्दतीने निवड केली ती खालील प्रमाणे :---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | स्पिनिंग विभाग एकूण कामगार संख्या | ४६२ | - | ३० |
| (२) | विव्हिंग विभाग एकूण कामगार संख्या | ८६१ | - | ५७ |
| (३) | इंजिन विभाग एकूण कामगार संख्या | ११३ | - | ७ |
| (४) | फोल्डींग विभाग एकूण कामगार संख्या | ७३ | - | ४ |
| (५) | प्रोसेसिंग विभाग एकूण कामगार संख्या | ४३ | - | २ |
| | एकूण निवड कामगार संख्या --- | | - | १०० |

वरील १०० कामगारांची नमुना पध्दतीने निवड करून कामगारांची प्रश्नावलीच्या साहाय्याने माहिती मिळविली व कामगारांचा संशोधनाच्या उद्दिष्टानुरूप अभ्यास केला.

## संशोधनासाठी माहिती मिळविणे ---

सदरच्या संशोधनासाठी कामगारांची माहिती मिळविण्यासाठी लेबर ऑफिसर यांची भेट घेऊन अभ्यासाचा हेतू स्पष्ट करून त्यांच्याशी चर्चा केली. विभागानुसार निवडलेल्या १०० कामगारांची माहिती गोळा करण्यासाठी पूर्व

नियोजित अशी मराठी भाषेतून प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीच्या साहाय्याने कामगारांची माहिती गोळा केली. प्रत्यक्ष भेटी देऊन कामगाराकडून प्रश्नावली भरून घेतली. हे करीत असताना कामगारांना सदरच्या संशोधनाचा उद्देश व उद्दिष्ट स्पष्ट करून त्यांच्यात विश्वासाचे वातावरण निर्माण केले. कोणत्याही कायदेशिर कारवाईसाठी सदरची माहिती वापरली जाणार नाही याची प्रथमत: लेबर ऑफिसरना कल्पना दिली. विशेषत: लेबर ऑफिसरशी वेळोवेळी अनौपचारिक चर्चा करण्याची पध्दती अभ्यासास फारच उपयुक्त ठरली.

संशोधनाच्यादृष्टीने लेबर ऑफिसरशी, जनरल मॅनेजरशी ,ऑडिट विभागाशी,चर्चा करून व कामगारांच्या प्रत्यक्ष मुलाखती आणि कामगार संघटनेच्या अध्यक्षाची मुलाखत इत्यादिचा संशोधन प्रकल्पाच्या विवेचनासाठी उपयोग झाला. तसेच सदरच्या संशोधनासाठी कामगार प्रश्नांच्या संदर्भातील पुस्तके, मासिके, नियतकालिके,तज्ञ अभ्यास मंडळाची मते, तज्ञ अभ्यासकाची मते, मिल्सचा अहवाल, मिल्सचा ताळेबंद इत्यादिचा संदर्भ व दुय्यम पुरावे म्हणून उपयोग करण्यात आला. वरील सर्व माध्यमातून माहिती गोळा करून त्या आधारे शोध निबंधाचे अहवाल लेखन केले आहे. सदरच्या अभ्यासाची खालील पाच प्रकरणात विभागणी केलेली आहे.

(१) श्री शाहू छत्रपति मिल्स, कोल्हापूर एक ऐत्याहासिक सर्वेक्षण.
(२) श्री शाहू मिल्सची सद्य:स्थिती ,भांडवल ,उत्पादन व रोजगार.
(३) सदर मिल्समधील कामगारांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती.
(४) श्री शाहू छत्रपति मिल्स आणि कामगार संघ.
(५) श्री शाहू मिल्समधील कामगारांची सामाजिक व आर्थिक व कामगार विषयक परिस्थिती सुधारण्यासाठी काढण्यात आलेले निष्कर्ष व उपाय.

अभ्यासाच्या मर्यादा --

(१) नमुना पध्दतीने निवडलेल्या कामगारांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांची प्रश्नावलीच्या साहाय्याने काढलेले निष्कर्ष जास्तीत जास्त परिपूर्ण व अचूक काढण्याचा प्रयत्न केलेला असला तरी कामगारांच्या प्रतिसादाच्या बाबतीत आणि निश्चित व अचूक आकडेवारीच्या संदर्भात कांही उणिवा राहण्याची शक्यता आहे. तरी परंतु प्रतिसादाच्या व आकडेवारीच्या बाबतीत जास्तीत जास्त अचूकता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

(२) श्री शाहू छत्रपति मिल्स ही आजारी मिल म्हणून घोषित केल्याने त्या मिलच्या संदर्भात असलेले व्यवस्थापन ,भांडवल, कर्ज, उत्पादन व विक्री या संबंधी काढलेले निष्कर्ष सर्वच कापड गिरण्यांना लागू पडतीलच असे मात्र नाही.

(३) श्री शाहू छत्रपति मिल्समधील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती विषयी काढलेले निष्कर्ष सर्वसामान्य प्रवृत्तीदर्शक असले तरी ते सर्वच कापड गिरण्यातील कामगारांच्या बाबतीत जसेच्या तसे लागू पडतीलच असे नाही. मात्र या अभ्यासावरुन श्री शाहू छत्रपति मिल्स मधील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती विषयी कल्पना येऊ शकते.